# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

सायंकाळ

(पोलीस वार्तापत्र)

**दिनांक ०८.१०.२०२५ बुधवार**

**१) नागपूर पोलीस आयुक्तालय तर्फे आयोजीत ''३३ वी वार्षीक पोलीस क्रिडा स्पर्धा– २०२५'' उदघाटन समारंभ संपन्न :–**

मा. श्री रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर, यांचे अध्यक्षतेखाली '' **३३ वी वार्षीक पोलीस क्रिडा स्पर्धा–२०२५** '' ही नागपुर शहर तर्फे आयोजीत करण्यात आली आहे. नमुद क्रिडा स्पर्धेचे आज दिनांक ०८.१०.२०२५ रोजी १६.०० वा. मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अध्यक्षतेत व मा. सह पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. श्री. शिवाजीराव राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे प्रमुख उपस्थितीत उदघाटन समारंभ पार पडला. उद्घाटन पुर्व प्रसंगी पोलीस बॅन्ड पथकाचे वाद्याने मा. पोलीस आयुक्त यांचे स्वागत करण्यात आले. तसेच, अध्यक्ष तथा उपस्थित मान्यवर यांना रोपटे देवुन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच, नंदनवन पोलीस ठाणे येथील दुर्गा मार्शल मध्ये कार्यरत महीला पोलीस यांनी 'आरंभ है प्रचंड' या गितावर पौराणिक कथा नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढविली. त्यानंतर एकूण ५ अधिकारी व १२४ कर्मचारी मिळून बनविलेल्या एकूण ४ चमूद्वारे उत्तम पथसंचालन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करतांना मा. सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर श्री. नविनचंद्र रेड्डी यांनी सांगीतले की, ३३ वी वार्षीक पोलीस क्रिडा स्पर्धा–२०२५ मध्ये एकुण ०४ संघ बनविण्यात आले आहेत. त्यामध्ये मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, नागपुर शहर अंतर्गत १) दक्षिण प्रादेशीक विभाग संघ तसेच, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, नागपुर शहर अंतर्गत २) उत्तर प्रादेशीक विभाग संघ, तसेच, संपुर्ण शाखा, नागपुर शहर अंतर्गत ३) गुन्हे शाखा संघ, आणि पोलीस मुख्यालय, नागपुर शहर अंतर्गत ४) पोलीस मुख्यालय संघ असे एकुण ०४ संघ बनविण्यात आले आहेत. संपुर्ण संघांनी मिळुन एकुण १८९ खेळाडुंनी या क्रिडा स्पर्धेत सहभाग नोंदविला असुन, त्यांनी आपला उत्तमोत्तम खेळ प्रदर्शित करून आपल्या खेळाडु वृत्तीचे दर्शन घडवावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व सहभागी खेळाडुंचे स्वागत केले. तसेच, सर्व उपस्थितीत पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांचे परीवार यांचे उदघाटन प्रसंगी मोठ्या संख्येने हजर राहुन खेळांप्रती जागरूकता दाखविलेबाबत त्यांचेही स्वागत केले. त्याचप्रमाणे, ऑल इंडीया क्रिडा स्पर्धा २०२५ मध्ये खेळलेल्या व विजय संपादन करून पारीतोषीक पटकाविलेल्या खेळाडुचे अभिनंदन करून, या ३३ वी वार्षीक पोलीस क्रिडा स्पर्धा –२०२५ मध्येसुध्दा चांगले योगदान देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच, पुढे जाण्यासाठी चांगली तयारी ही खुप महत्वाची व मोलाची असल्याचे सांगुन, अशा स्पर्धेतुन चांगले खेळाडु तयार होत असतात असे मत त्यांनी व्यक्त केले. त्याचप्रमाणे स्पर्धकांना चांगली तयारी करता यावी, या उद्देशाने खेळाचे साहीत्य देण्याचे आश्वासन देवुन, प्रशस्त जीम उपलब्ध होत असलेबाबत समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे या ३३ वी वार्षीक पोलीस क्रिडा स्पर्धा –२०२५ मध्ये ॲथलेटीक्स, खो–खो, कबड्डी, वुशु, ज्युडो, कराटे, हॉलीबॉल, बास्केटबॉल अशा स्पर्धा

आयोजीत असुन, मा. लोहीत मतानी पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा यांनी या खेळांकरीता विशेष योगदान देवुन मोलाची जबाबदारी पार पडल्याबाबत त्यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच, पत्रकारीतेमुळे आपण सर्वापर्यंत पोहचत असतो, म्हणुन सर्व पत्रकार, न्युज मिडीया प्रतीनिधी यांचेसुध्दा आभार व्यक्त करून, अभिनंदन केले. तसेच सर्व खेळाडूना आपले सांघीक तथा वैयक्तीक खेळातून खेळ सादरीकरणास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे उदघाटन करतांना, मा. पोलीस आयुक्त यांनी पारीतोषीकाचे अनावरण सुदधा केले. तसेच, ऑल इंडीया लेव्हल स्पर्धा २०२५ मध्ये विशेष प्राविण्यासह सुवर्ण पदक प्राप्त खेळाडु श्री. शुभम जांगडे याचे हस्ते मशाल पथ संचालन पार पाडुन, मा. पोलीस आयुक्तांनी मशालद्वारे ज्योत पेटवुन, कार्यक्रमाचे उद्घाटन समारंभ पार पडल्याचे जाहीर केले. यांनतर मा. पोलीस आयुक्तांचे उपस्थीतीत सर्व खेळाडुंना सामुहीक सांघीक शपथ आर.एस.आय. पोलीस मुख्यालय यांचे मार्फतीने शपथ देण्यात आली.

''३३ वी वार्षीक पोलीस क्रिडा स्पर्धा –२०२५'' उदघाटन समारंभ कार्यक्रमादरम्यान, मा. सर्व पोलीस उप आयुक्त (परि. १ ते ६), नागपुर शहर, सर्व मा. सहायक पोलीस आयुक्त आणि सर्व मा. पोलीस निरीक्षक तसेच, अधिकारी व कर्मचारी, तसेच खेळाडु व त्यांचे परीवारातील सदस्य मोठ्या संख्यने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. कोसे, सपोनि. तथा सफौ. संजयसिंग ठाकुर यांनी केले. तर आभार प्रदर्शन मा. श्री. दिपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), नागपुर शहर यांनी केले.









**<u>२) मा. न्यायालयातुन आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा :–</u>**

दिनांक ०८.१०.२०२५ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधिश–१, नागपुर श्री. आर.एम सदरानी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ३१९/२०१८ मधील, पोलीस ठाणे नंदनवन येथील अप. क्र. २९८/२०१८ कलम ३०२, २०१, ४०४, ३४ भा.दं.वी, या गुन्ह्यातील **आरोपी नामे १) रूपसिंग उर्फ किसन भावसिंग सोलंकी, वय ३२ वर्षे, रा. सातारकोलारी, ता. खाटीगाव, जि. देवास, म.प्र, याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपी क्र. १ यास कलम ३०२ भा.दं.वी अन्वये आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा व ३,०००/– रू. दंड आणि**

**दंड न भरल्यास ०१ महिना अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. तसेच आरोपी क्र. १ व आरोपी क्र. २) दिनेश कुंवरसिंग मौर्या वय २२ वर्ष रा. बावडीखेडा, ता. उन्नाव, जि. देवास, म.प्र यांना कलम २०१, ३४ भा.द.वी अन्वये १८ महिने साध्या कारावासाची शिक्षा व प्रत्येकी ३,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महिना अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

फिर्यादी यांचे भाऊजी नरेन्द्र हरीनखेडे वय ३५ वर्ष रा. तरोडी, बु., नागपूर यांचे शेतीचे बाजूला, झवर यांचे फार्म हाऊस असुन तेथे आरोपी क्र. २ रूपसिंह उर्फ किसन भावसिंह सोलंकी वय ३२ वर्ष हा काम करित होता व परीवारासह राहत होता. रूपसिंह उर्फ किसन याची पत्नी मिना हिचे सोबत फिर्यादीचे भाऊजीचे असलेल्या संबंधावरून, दिनांक २२.०४.२०१८ चे २१.०० वा. दि. २३.०४.२०१८ चे ०७.०० वा. चे दरम्यान, आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे भाऊजीला जिवानीशी ठार केले व आरोपी क्र. २ याचे मदतीने त्यांचे प्रेत पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने गावाबाहेर लपवून ठेवले. अशा फिर्यादी मुकेश रमेश भगत वय २५ वर्ष रा. देवीनगर, वाठोडा, नंदनवन, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींना दि. २५.०४.२०१८ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तपासी अधिकारी तत्कालीन सपोनि. श्री. जि.जे वळवी यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. आनंद ठाकरे व श्यामसुंदर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. जलतारे व ठाकूर यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. अरूण खेरगडे व प्रमोद येवले यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**<u>कळमणा पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक, ११ वाहने जप्त.</u>**

दिनांक २५.०९.२०२५ चे १०.०० वा. ते ११.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी विनय सुखदेव दुपारे, वय ४२ वर्षे, रा. जिजर मॉल जवळ, जरीपटका, नागपूर यांनी त्यांची पॅशन प्रो दुचाकी क्र. एम.एच. ४९ एम ७२३० किंमती २५,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, कळमणा सब्जी मार्केट, खळा नं. २, समोर पार्किंगमध्ये लॉक करून, पार्क करून भाजी घेण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

कळमणा मार्केट येथुन मोठया प्रमाणात दुचाकी वाहन चोरी होत असल्याने, पोलीसांनी तांत्रीक तपास करून आरोपीचा आलेख तयार केला. तसेच सापळा रचून दिनांक ०५.१०.२०२५ रोजी आरोपी हा कळमणा मार्केट येथे दुचाकी वाहन चोरी करण्यास आला असता, त्यास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव देवेश देवेन्द्र सनोडीया वय २० वर्ष रा. सुंदर नगर, भांडेवाडी, नागपूर असे सांगीतले. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्हयातील वाहन चोरी केल्याची कबुली दिली. तसेच त्याने वर नमुद गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे कळमणा हद्दीतुन स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ३१ डी.डी ६३२६ किंमती १०,०००/—रू. ची, लियो दुचाकी क्र. एम.एच. ४९ ए.एन १७०७ किंमती ३०,०००/—रू. ची, स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ४९ ए.एन १२९६ किंमती ३०,०००/—रू. ची, स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ३० यू ८३८१ किंमती १०,०००/—रू. ची, स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ४९ ए.एक्स ०३६४ किंमती ४०,०००/—रू. ची, सि.डी डिलक्स दुचाकी क्र. एम.एच. ४९ बी.एल ८८०१ किंमती २०,०००/—रू. ची, स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ४९ झेड ५१०७ किंमती ३०,०००/—रू. ची, आय स्मार्ट स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ४९ एक्स ४१०४ किंमती ३०,०००/—रू. ची, स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ४९ बी.पी २३७० किंमती २५,०००/—रू. ची व पॅशन प्रो दुचाकी क्र. एम.एच. ३१ डी.एक्स ३९०० किंमती ४०,०००/—रू. ची ईतर एकुण १० वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपीचे

ताब्यातुन चोरी केलेले एकुण ११ दुचाकी वाहने किंमती अंदाजे २,९५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. निकेतन कदम, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्रीमती. श्वेता खाडे, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. प्रविण काळे, सपोनि. शशीकांत मुसळे, पोहवा. प्रमोद कंगाले, विशाल भैसारे, पोअं. नितीन मिश्रा, ललीत शेंड, अविनाश ग्वालबंशी व अजय गटलेवार यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे जरीपटका :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०७.१०.२०२५ चे २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे प्रियांशू उर्फ बाबू रविसिंग छेत्री वय २१ वर्ष रा. लेंडीग्राम नाल्या जवळ, लुंबीनी नगर, जरीपटका, नागपूर हा आपले राहते घरी झोपला असता, त्याचा मित्र नामे ध्रुव लालबहादूर शाहू वय २१ वर्ष रा. ओमसाई नगरी, शिव मंदीर जवळ, नारा, नागपूर हा फिर्यादीचे घरी आला व त्याने तिचा भाऊ घरी असल्या बाबत विचारले असता फिर्यादीने जेवन करून झोपल्याचे सांगीतले. त्याने फिर्यादीचे भावास झोपेतून उठवून ''चल अपन थोडे देर मे बाहर से आते है'' असे म्हणून त्यास आपले मोटरसायकलवर बसवून घरून घेवुन गेला. दिनांक ०८.१०.२०२५ चे सकाळी ०६.४५ वा. चे सुमारास पोलीसांनी येवून फिर्यादीस तिचा भाऊ यास प्लॉट नं. ४४, ओमसाई नगर—२ चे बाजूला, नारा येथील एका निर्माणाधीन घरात कोणीतरी धारदार शस्त्राने व दगडाने मारून जखमी केल्याचे सांगीतले. तसेच त्यास मेयो हॉस्पीटल येथे उपचाराकरीता नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले असे सांगीतले.

फिर्यादीचे भाऊ प्रियांशू उर्फ बाबू यास आरोपी ध्रूव शाहू याने अज्ञात कारणावरून धारदार शस्त्राने वार करून जिवानीशी ठार केले अशा फिर्यादी कु. शिल्पा रविसिंग छेत्री, वय २२ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. ठाकरे ९८२२९२६५४९ यांनी आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीचा शोध घेवुन, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, वैशाली नगर, प्लॉट नं. एफ/१८, संबोधी कॉलोनी, पाचपावली, नागपुर येथे फिर्यादी रोहीत ईश्वरलाल पसेरकर, वय ३५ वर्षे, हे घराचे वरचे माळयावर परिवारासह राहतात, खालचे माळयावर त्यांचे भाऊ शुभम पसेरकर वय ३० वर्ष हे राहतात. दिनांक ०६.१०.२०२५ चे २३.०० वा. ते दि. ०७.१०.२०२५ चे ०६.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे भाऊ घराला कुलूप लावून परिवारासह उमरेड येथे सासऱ्याचे घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे भावाचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडुन, घरात प्रवेश करून बेडरूम

मधील लाकडी आलमारीतील रोख १,००,०००/—रू., सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी ९८ ग्रॅम व चांदीचे दागिने एकुण वजनी ८०० ग्रॅम असा एकुण ५,४७,३२०/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. शेख ९४२२११००६४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे शांतीनगर :—** सौ. लता राजेश कुकवास, वय ४८ वर्षे, रा. विनायकराव देशमुख हायस्कुल जवळ, बास्केट बॉल ग्राऊंड समोर, प्लॉट नं. १७४, नागपूर हया दिनांक ०४.१०.२०२५ रोजी ०८.१५ वा. पासुन पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— साधारण, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— निळया रंगाची साडी व ब्लाऊज घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे यशोधरानगर :—** श्रीमती. रोहीणी बन्टी पिरूनिया, वय ३० वर्षे, रा. कांजी हाऊस चौक, डोरले आटा चक्की जवळ, नागपूर हया दिनांक २०.०९.२०२५ रोजी १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— साडी व ब्लाऊज घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे यशोधरानगर :—** आकाश जगदीश उपवंशी, वय २३ वर्षे, रा. गरीब नवाज नगर, यशोधरानगर, नागपूर हा दिनांक ०६.१०.२०२५ रोजी १०.३० वा. पासुन पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ७ इंच, केस— काळे, अंगात— हिरव्या रंगाचा फुल शर्ट व निळया रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो.

**४) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** रविन्द्र हिम्मतराव पाटील, वय ४८ वर्षे, रा. प्लॉट नं. २४, चक्रधर नगर, अयोध्या नगर, हुडकेश्वर, नागपूर हे दिनांक ०४.१०.२०२५ रोजी ०८.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— निमगोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ८ इंच, केस— काळे, अंगात— राखडी रंगाचा फुल बाहयाचा शर्ट व नेव्ही ब्ल्यू रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.


लता


रोहीणी


आकाश


रविन्द्र

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**